सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

### प्राधिकृत प्रकाशन

क्र.८] मंगळवार, दिनांक ६ जून २०२३ : ज्येष्ठ १६, शके १९४५ [किंमत ०.०० रु.]

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत

## भाग एक-अ औरंगाबाद विभाग

१

**जिल्हाधिकारी हिंगोली यांजकडून**

**सूचना**

**औंढा नागनाथ शहराच्या प्रारुप विकास योजनेमधील फेरबदल / बदलांच्या सूचीचे महाराष्ट्र प्रादेशिक**

**नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम -२८ (४) अन्वये प्रसिध्दीकरण.**

**क्र. २०२३/विभाग/कावि-१५७.–** ज्याअर्थी, औंढा नागनाथ नगर पंचायतीने, नियोजन प्राधिकरण म्हणून, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम -२६ (१) नुसार प्रारुप विकास योजना, **औंढा नागनाथ दि. ०३/११/२०२२** चे ठरावान्वये नागरिकांच्या सूचना / हरकती मागविण्यासाठी प्रसिध्द केली आहे. सदरची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात **औरंगाबाद** विभागीय पुरवणी भाग, **एक-अ** मध्ये दि. ०८ डिसेंबर, २०२२ रोजी प्रसिध्द झाली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त योजनेवर विहीत मुदतीत प्राप्त सूचना व हरकतींचा विचार करुन उक्त अधिनियमाच्या कलम-२८ (४) नुसार स्थापन झालेल्या नियोजन समितीने तिचा अहवाल उक्त नियोजन प्राधिकरणाकडे दि. ०८/०३/२०२३ रोजी सादर केला;

आणि ज्याअर्थी, नियोजन समितीने सादर केलेल्या अहवालावर विचारांती उक्त नियोजन प्राधिकरणाने, तो मान्य करुन बदल उक्त अधिनियमाच्या कलम-३० नुसार शासनाकडे मंजूरीसाठी सादर करण्यासाठी ठराव क्र. ४१६, दि. १३/०४/२०२३ पारित केलेला आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम - २८ (४) खालील तरतूदीनुसार उक्त योजनेच्या मसुद्यात केलेले फेरबदल / बदल नागरिकांच्या अवलोकनार्थ प्रसिध्द करणे आवश्यक आहे;

त्याअर्थी उक्त प्रारुप विकास योजनेचा मसूदा नियोजन प्राधिकरणाने उक्त अधिनियमाचे कलम-२८ (४) नुसार नागरिकांच्या माहितीसाठी प्रसिध्द करण्यात येत आहे. उक्त प्रारुप विकास योजनेचा नकाशा खालील नमुद केलेल्या कार्यालयात कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत ३० दिवसाच्या कालावधीकरीता नागरिकांच्या अवलोकनार्थ ठेवण्यात आला आहे.

**१. सहायक संचालक, नगर रचना, हिंगोली शाखा, हिंगोली.**

**स्थळः औंढा नागनाथ.**

**आपला विश्वासु,**
(सचिन जैस्वाल)
मुख्याधिकारी
नगरपंचायत, औंढा नागनाथ

**परिशिष्ट-अ**

**अधिनियमाचे कलम-२८(४) नुसार केलेल्या फेरबदल/बदलांची सुची**

| क्रमांक | फेरबदल / बदलांचा तपशिल |
|---|---|
| M-1 | ग.नं. १८५ नाल्याच्या दक्षिणेकडील क्षेत्र शेती विभागातून वगळून रहिवास क्षेत्रात समाविष्ट केले. |
| M-2 | गावठाणामधील नागेश्वर प्राथमिक शाळेलगत 'इदगाह' चे नामाभिदान 'दरगाह' करण्यात आले. |
| M-3 | ग.नं. ३६४ मधील उत्तर पश्चिम कोप-यातील विद्यमान रस्ता वगळून रहिवास क्षेत्रात समाविष्ट केला. |
| M-4 | गट नं. २७३ मधील २४ मी. प्रस्तावित रस्त्याची आखणी दक्षिणेकडे दर्शवून रस्त्याखालील क्षेत्र रहिवास क्षेत्रात समाविष्ट केले. |
| M-5 | गट नं. ३३६ चे दक्षिण-पुर्वे कडील क्षेत्र शेती विभागातून वगळून रहिवास क्षेत्रात समाविष्ट केले. |
| M-6 | गट नं. ३४१ ते २४ मी. प्रस्तावित रोडच्या दक्षिणेकडील क्षेत्र शेती विभागातून वगळून रहिवास क्षेत्रात समाविष्ट केले. |
| M-7 | गट क्र. २२७, २२८, २२९, २३० मधून दर्शविलेला १८.० मी. विकास योजना रस्ता वगळुन त्याखालील क्षेत्र रहिवास क्षेत्रात समाविष्ट केले. |
| M-8 | बस स्थानक ते नागनाथ मंदीराकडे जाणा-या विद्यमान रस्त्यास दर्शविलेले १८ मी. रुंदीकरण वगळुन त्याखालील क्षेत्र लगतच्या वापरात समाविष्ट केले. |

**मुख्याधिकारी**
**औंढा नागनाथ नगर पंचायत**
**औंढा नागनाथ**

---

**By Chief Officer Nagar Panchyat Aundha Nagnath**

**<u>Notice</u>**

**Publication of list of Modifications / Changes in Draft Development Plan of Aundha Nagnath u/s 28 (4) of Maharashtra Regional & Town Planning Act, 1966**

Whereas, **Aundha Nagnath** Nagar Panchyat, being Planning Authority has published the Draft Development Plan of Aundha Nagnath u/s 26 (1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 vide Resolution dated 03/11/2022 for inviting suggestions / objections from public. The said Notice is published in Maharashtra Government Gazzette of Aurangabad Division, Supplement part 1-A Dated 08/12/2022.

And whereas, after considering the suggestions / objections to the said Plan received within stipulated period, the Planning Commitee consituted u/s 28 (4) of the said Act, has submitted its report to the said Planning Authority on Dt. 08/03/2023.

And whereas, the said Planning Authority after considering the report submitted by Planning Commitee, accepted it and passed Resolution No.416, dated 13/04/2023 to make modifications / changes to the said plan and to submit the said Plan for sanction to the Government u/s. 30 of the said Act;

And whereas, it is necessary to publish the said modifications / changes made in the said Plan for inspection fo the public as per 28 (4) of the said Act;

Now, therefore, the list of modifications /changes made u/s 28 (4) of the Act, by the said Planning Authority is hereby published as Appendix-A as per the provisions of said Act for kept open for the inspection of the public in the following offices, on working days, during office hours for a period of 30 days.

1. The chief officer, Aundha Nagnath Nagar Panchyat Aundha Nagnath.
2. Assistant Director of Town Planning Hingoli Branch.

**Place: Aundha Nagnath**

**Chief Officer**
**Nagar Panchyat Aundha Nagnath**

**Appendix - A**
**List of modifications/changes made u/s 28 (4) of the Act**

| No. | Details of modifications / changes |
|---|---|
| M-1 | Area of Gut No. 185 (pt) on South Side of Nala is deleted from Agriculture Zone & included in Residential Zone. |
| M-2 | Idgah Near Nageshwar Primary School in congested area is Redesignaed as Dargah. |
| M-3 | Existing Road in North-West corner of Gut No. 364 is deleted and included in Residential Zone. |
| M-4 | 24 mtr wide proposed road in Gut No. 273 is Realigned towards South side and land so Released in included in Residential Zone. |
| M-5 | South-East part of Gut No. 336 is delected from Agricultural Zone & included in Residential Zone. |
| M-6 | Gut No. 341 (pt) on south side of proposed road is deleted form Agricultural Zone & included in Residential Zone. |
| M-7 | 18 mtr. proposed Road in Gut No. 227, 228, 229, 230 is deleted & included in Residential Zone. |
| M-8 | Proposed 18 mtr widening to existing Road from Bus Stand to Nagnath Temple is deleted & land so released of Road Widening is included in Adjacent Zone. |

Place: Aundha Nagnath.

**Chief Officer**
**Aundha Nagnath Nagar Panchyat**
**Aundha Nagnath.**

---------------------

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR RUPENDRA DINESH MORE. PRINTED AT GOVERNMENT PRESS, PAITHAN ROAD, AURANGABAD-431 005 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR RUPENDRA DINESH MORE.